नियमीत दिवाणी दावा क्र. १३/२०१६
मुश्तकीन वि. मुज्ञफर व इतर

## निशाणी क्र.५६ कडील आदेश

प्रस्तूतचा अर्ज वादीने निशाणी क्र.२२ कडे निश्चीत करण्यात आलेला मुद्दा क्र.७ दाव्यास आवश्यक पक्षकार समाविष्ट न केल्याची बाधा येते काय हा मुद्दा रद्द करण्यासाठी दाखल केला आहे. अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, प्रस्तूतच्या दाव्यामध्ये वादीने त्यांचा कायदेशीर हिस्साबाबत जाहिर ठराव करुन मिळण्याची मागणी केली आहे. प्रस्तूत दाव्यामध्ये वादीने हिस्सा वाटप करुन मागणी केलेली नाही. त्यामुळे उपरोक्त मुद्दा रद्द करणे आवश्यक आहे. या कारणास्तव वादीने प्रस्तूतचा अर्ज मंजूर करण्याची मागणी केली आहे. प्रतिवादी यांनी निशाणी क्र.५७ कडे आपले म्हणणे दाखल करुन सदरचा मुद्दा निशाणी क्र.१० कडे दाखल केलेल्या प्राथमिक मुद्दा काढण्याच्या अर्जावरुन निश्चीत करण्यात आला आहे. त्यामुळे प्रस्तूतचा अर्ज १०००/– रुपये खर्चासह फेटाळण्यात यावा अशी प्रतिवादीने मागणी केली आहे.

२. वादी तर्फे विद्वान वकील श्री. डी. एन. पाटील आणि प्रतिवादी तर्फे विद्वान वकील श्री. पी. एच. वर्तक यांचा युक्तीवाद ऐकला. वादपत्र आणि निशाणी क्र.१८ कडील कैफियत यांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी यांनी कैफियतीच्या परिच्छेद क्र.३ मध्ये दाव्यास आवश्यक पक्षकार समाविष्ट केले नसल्याबाबत तक्रारी केल्या आहेत. केवळ दावा वाटपासाठी नाही या कारणास्तव प्रस्तूतचा मुद्दा आवश्यक नाही असे म्हणता येणार नाही. प्रस्तूत दाव्यास इतर पक्षकारांचे हितसंबंधी गुंतलेले आहेत किंवा नाही ही बाब केवळ उपरोक्त मुद्दा निश्चीत केल्यानंतर वादी व प्रतिवादी यांना त्याबाबत पुरावा देण्याची संधी दिल्यानंतरच ठरू शकते. त्यामुळे सदरचा मुद्दा रद्द करणे न्यायोचीत ठरणार नाही यामतास मी पोहोचलो आहे. करीता मी खालील आदेश पारीत करतो.

<u>**आदेश**</u>

अर्ज फेटाळण्यात येतो.

(खुल्या न्यायालयात जाहिर)

SANDEEP G SARODE Digitally signed by SANDEEP G SARODE Date: 2023.10.18 18:32:24 +0530

मुरुड (सं. गं. सरोदे)

दिनांकः १८/१०/२०२३ दिवाणी न्यायाधीश क. स्तर, मुरुड